**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेस नोट** दिनांक :- ०६/०८/२०२३

## नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे मासरेडचे आयोजन
## अवैध गावठी दारू हातभट्टयांवर ३१ ठिकाणी छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांचे आदेशान्वये जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कारवाई सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर आज रोजी ग्रामीण पोलीस दलातर्फे मासरेडचे आयोजन करण्यात आले होते.

आज दिनांक ०६ ऑगस्ट रोजी ग्रामीण पोलीसांनी जिल्हयातील विविध ठिकाणी हातभट्टीच्या दारूची अवैधपणे गाळप करणा-या एकूण ३१ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकून सुमारे ५,४७,९२५/- रूपये किं.ची तयार गावठी दारू, रसायन व इतर साधन सामुग्री जप्त करून ३७ इसमांवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्याखाली ३१ गुन्हे दाखल केले आहेत.

या धाडसत्रात जिल्ह्यातील जायखेडा मधील ८, सटाणा मधील ४, वाडीव-हे, इगतपुरी, मालेगाव तालुका मधील प्रत्येकी ३, कळवण २, घोटी, पेठ, सायखेडा, देवळा, सुरगाणा, नांदगाव, चांदवड, मालेगाव किल्ला मधील प्रत्येकी १ ठिकाणांचा समावेश आहे. यात जिल्हयातील डोंगर-द-या, नदी-नाल्यांच्या लगत असलेल्या गावांमध्ये गावठी दारू हातभट्टयांवर छापे टाकून पोलीसांनी मोठ्या प्रमाणावर मालमत्ता हस्तगत केली आहे.

सदर मासरेड दरम्यान पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी स्वत: सहभाग घेवून शीघ्रकृती दलाचे जवानांसह चांदवड तालुक्यातील वडबारे शिवारात गणेशा डोंगराचे पायथ्याशी छापे टाकून अवैधरित्या गावठी दारूची गाळप करणा-या इसमांवर कारवाई केली आहे.

जिल्हयातील अवैध व्यवसायांचे उच्चाटन करण्यासाठी पोलीस ठाणे निहाय तसेच ०८ विशेष पथकांच्या मदतीने जिल्ह्यातील वेगवेगळया ठिकाणी चालणा-या अवैध व्यवसायांवर धडक कारवाया करण्यात येत आहेत.

नागरिकांनी आपल्याकडील उपयुक्त माहिती अवैध व्यवसाय विरोधी हेल्पलाईन क्रमांक ६२६२ २५ ६३६३ यावर व्हॉटस्ॲपच्या माध्यमातून द्यावी, माहिती देणा-याचे नांव देखील विचारण्यात येणार नाही. जिल्हयातील सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांचे निर्मूलन करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षी श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.